पोलीस स्टेशन, आरमोरी जि. गडचिरोली

N.C.R.B (एन.सी.आर.बी)

I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म - १)

# FIRST INFORMATION REPORT

**(Under Section 154 Cr.P.C.)**

प्रथम खबर अहवाल

(कलम १५४ फौजदारी प्रक्रिया संहिता)

1. **District (जिल्हा):** गडचिरोली  **P.S.(ठाणे):** अरमोरी

**FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0267  **Year (वर्ष):** 2023

**Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):** 15/08/2023 00:00

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |

3. (a) **Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**

1. **Day(दिवस):** सोमवार
   **Time Period (कालावधी):** पहर 5
   **Date From (दिनांक पासून):** 14/08/2023
   **Date To ( दिनांक पर्यंत):** 14/08/2023
   **Time From (वेळेपासून):** 13:51 बजे
   **Time To (वेळेपर्यंत):** 15:05 बजे

(b) **Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**

**Date (दिनांक ):** 14/08/2023  **Time (वेळ):** 18:30 बजे

(c) **General Diary Reference (रोजनामचा संदर्भ ):**

**Entry No. (नोंद क्र.):** 001

**Date & Time (दिनांक आणि वेळ):** 15/08/2023 00:00 बजे

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी
5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**

1.(a) **Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):**

दक्षिण, 35 किमी  **Beat No. (बिट क्र.):**

(b) **Address (पत्ता):** तलाठी कार्यालय , तलाठी कार्यालय वडधा ,आरमोरी

(c) **In case, outside the limit of this Police Station, then (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):**

**Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):**

**District(State) (जिल्हा(राज्य)):**

6. **Complainant / Informant** (तक्रारदार/माहिती देणारा):

(a) **Name** (नाव): श्री. विलास नाजुकराव सेलोटे

(b) **Father's/Husband's Name**(वडील / पती चे नाव) :

(c) **Date/Year of Birth** (जन्म तारीख/वर्ष): 1981

(d) **Nationality** (राष्ट्रीयत्व): भारत

(e) **UID No.** (यु.आय.डी. क्र.):

(f) **Passport No.**(पारपत्र क्र.):

**Date of Issue** (दिल्याची तारीख):

**Place of Issue** (दिल्याचे ठिकाण):

(g) **ID details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License, PAN)** ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )

| **S.No.** (अ.क्र.) | **ID Type** (ओळखपत्राचा प्रकार) | **ID Number** (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

(h) **Address** (पत्ता):

| **S.No.** (अ.क्र.) | **Address Type** (पत्याचा प्रकार) | **Address** (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | उपसरपंच ग्रा पं वडधा,वडधा पो देलोडा ,आरमोरी,अरमोरी,गडचिरोली, महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पता | उपसरपंच ग्रा पं वडधा,वडधा पो देलोडा ,आरमोरी,अरमोरी,गडचिरोली, महाराष्ट्र,भारत |

(i) **Occupation** (व्यवसाय): शेतकरी

(j) **Phone number** (फोन नं.):

**Mobile** (मोबाइल नं.): 91-9689701079

7. **Details of known/suspected/unknown accused with full particulars** (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):

| **S.No.** (अ.क्र.) | **Name** (नाव) | **Alias** (उर्फनाव) | **Relative's Name** (नातेवाईकाचे नाव) | **Present Address** (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | रमेश महागु कवडो | | | 1. तलाठी, साजा क्र 15 ,वडधा , आरमोरी,अरमोरी,गडचिरोली, महाराष्ट्र,भारत |

8. **Reasons for delay in reporting by the complainant/informant** (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):

9. **Particulars of properties of interest** (संबंधीत मालमत्तेचा तपशील):

| **S.No.** (अ.क्र.) | **Property Category** (मालमत्ता वर्ग) | **Property Type** (मालमत्ता प्रकार) | **Description** (वर्णन) | **Value(In Rs/-)** (मुल्य (रू. |
|---|---|---|---|---|
| 1 | इलेक्ट्रिकल आणि इलेक्ट्रॉनिक सामान | संगणकाचे सुटे भाग | सॅनडिक्स कंपनीचा मेमरी कार्ड | 0.00 |

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. |
|---|---|---|---|---|
| 2 | कागदपत्रे आणि मुल्यवान रोखे | फाईल्स, कागदपत्र | जप्ती पंचनामाची कागदपत्रे | 0.00 |
| 3 | नाणे आणि चलन | भारतीय- रुपया | 500 रु.च्या 24 नोटा | 12,000.00 |
| 4 | इतर | घरगुती वस्तु | फुल पॅन्ट | 0.00 |

10 **Total value of property (In Rs/-)**
**(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):**

12,000.00

11.**Inquest Report / U.D. case No., if any**
(इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):

| S.No. (अ.क्र.) | UIDB Number (यु.आय.डी.बी.क्र.) |
|---|---|

12.**First Information contents (प्रथम खबर हकीकत ):**

फिर्याद पोलीस स्टेशन आरमोरी दिनांक 14/08/2023
मी श्री.विलास नाजुकराव सेलोटे, वय 42 वर्षे धंदा-शेती, (उपसरपंच ग्रा.पं. वडधा) मु. कुरंजा पो. देलोडा ता. आरमोरी जि. गडचिरोली येथे राहत असुन आज दिनांक 14/08/2023 रोजी सकाळी 08.31 वा. लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, गडचिरोली येथील पोहवा नथ्थु धोटे यांना फोनव्दारे एका लोकसेवकाविरूध्द तक्रार असल्याबाबत माहिती दिली. त्यानुसार आज दिनांक 14/08/2023 रोजी लाचलचुपत प्रतिबंधक विभाग, गडचिरोली येथील पोलीस निरीक्षक श्री शिवाजी राठोड यांनी शासकिय पंच व स्टॉफसह शासकिय वाहनाने मौजा वडधा गावापासून जवळच असलेल्या आरमोरी ते शिर्षी रोड लगतच्या शेतामध्ये पोहोचले. त्यांनी सांगितल्याप्रमाणे मी आरमोरी ते शिर्षी रोडलगतच्या शेतामध्ये माझे अॅक्टीवा स्कुटीने हजर होतो. त्यांचे समक्ष लोकसेवकांविरुद्ध लाच मागणी संबंधाने लेखी तक्रार दिली ती खालीलप्रमाणे आहे.
मी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग कार्यालय गडचिरोली कॅम्प वडधा येथे आज दिनांक 14/08/2023 रोजी हजर येवुन लेखी तक्रार देतो की, मी वरील पत्यावर कुटूंबासह राहत असून शेतीचे काम करतो. माझे नावे जॉनडिअर कंपनीची एक नविन ट्रक्टर असुन तिचे पासींग न झाल्याने अजुनपर्यंत क्रमांक मिळाले नाही. सदर ट्रॅक्टरने दि. 08.08.2023 रोजी मुरूम आणण्यासाठी ट्रॅक्टर ड्रॉयव्हर समीर कळाम यांस मौजा डार्ली मुरूम खदान येथे पाठविलो होतो. समीर कळाम यांनी अंदाजे 04.00 वा. दरम्यान मला फोन करून सांगितला की, ट्रॅक्टरने मुरूम भरूण आणत असतांना मौजा डार्ली पांदन रस्त्यावर कवडो पटवारी, वडधा यांनी ट्रॅक्टर पकडले आहे, असे सांगितले. त्यानंतर मी समीर कळाम याला तलाठी साहेबाकडे फोन देण्यास सांगितले. त्यावेळी मी ड्रॉयव्हर समीर कळाम याचे मोबाईलवरून रमेश कवडो तलाठी, वडधा यांचे सोबत बोललो असता त्यांनी मी बघतो, असे म्हणून पंचनामा करून ट्रॅक्टर त्याच दिवशी सोडून दिली. दि.10/08/2023 रोजी मी कामानिमित्त मौजा बोरीचक येथे गेलो असता श्री. रमेश कवडो, तलाठी वडधा यांची दुपारी 12.30 ते 01.00 वा. दरम्यान भेट झाली. त्यावेळेस श्री. रमेश कवडो, तलाठी वडधा यांनी मला ''दि. 08/08/2023 रोजी तुमची मुरूमाने भरूण असलेली ट्रॅक्टर पकडून सोडून दिलो व त्या ट्रॅक्टरवर कोणतीही कारवाई करायची नसेल तर मला 15,000/-रू. द्या, जर तुम्ही मला 15000/-रू. दिले नाही तर मी ट्रॅक्टरवर कारवाई करीन असे म्हणाल्याने, मी पैशाची व्यवस्था करून आपणास येवून भेटतो असे म्हणालो. तेंव्हा त्यांनी ठिक आहे, सोमवार दि. 14/08/2023 रोजी तलाठी कार्यालय वडधा येथे दुपारी 01.00 वाजेपर्यंत 15,000/-रूपये आणून द्या, असे बोलून लाचेची मागणी करून निघून गेले. श्री. रमेश कवडो, तलाठी वडधा यांनी मला माझी मुरूमाने भरूण असलेली ट्रॅक्टर पकडून सोडून दिल्याचा मोबदला व त्या ट्रॅक्टरवर कोणतीही कारवाई न करण्याच्या कामाकरीता 15,000/- रू लाच रक्कमेची मागणी केली आहे. श्री. रमेश कवडो, तलाठी वडधा यांना रुपये 15,000/- लाच रक्कम देण्याची माझी मुळीच ईच्छा नसल्याने त्यांचे विरूध्द कारवाई होणेकरीता स्वेच्छेने लाचलुचपत प्रतिबंधक विभाग गडचिरोली कॅम्प वडधा येथे तक्रार देण्यास आलो. सदर लाच रक्कम 15,000/- रू. मी सोबत आणले आहे. श्री. रमेश कवडो, तलाठी वडधा यांचेशी माझे कोणतेही वैयक्तीक दुश्मनी नसुन आर्थिक देवाण-घेवाण/उसणवारी अथवा भांडण नाही. म्हणुन मी त्यांचेविरुध्द कायदेशिर कारवाई करण्याकरीता स्वेच्छेने तक्रार देत आहे. मी सोबत आणलेले रु. 15,000/- हे माझे वैयक्तिक

बचतीतील आहेत. त्यानंतर पोलीस निरीक्षक श्री. शिवाजी राठोड साहेब यांनी त्यांचे सोबत आलेल्या स्टॉफची व शासकिय पंचांची ओळख करून दिली. श्री शिवाजी राठोड यांनी दोन्ही पंचांना थोडक्यात हकिकत सांगुन माझे स्वहस्ताक्षरात लिहलेली तक्रार पंचांना वाचण्यास दिली. त्यानंतर सदरच्या तक्रार अर्जावर मी स्वतः, दोन्ही पंचांनी स्वाक्षरी केली. त्यानंतर पोलीस निरीक्षक श्री. शिवाजी राठोड साहेब यांनी सुध्दा स्वाक्षरी केली. यानंतर पोलीस निरीक्षक श्री. शिवाजी राठोड साहेब यांनी माझेकडुन सापळा कारवाईसाठी वापरण्यात येणारी लाच रक्कम रू. 15,000/- (रू. 500/- दराच्या 30 चलनी नोटा) घेतल्या. त्यावेळी सदरच्या नोटांचे क्रमांक नोंदवुन घेण्यात आले. त्यानंतर सदरच्या नोटांना अँथ्रॉसिन पावडर लावण्यात येणार असल्याचे सांगुन त्याचे गुणधर्म सांगीतले. तद्नंतर लाचेच्या रक्कमेस अँथ्रॉसिन पावडर लावली व त्याचे प्रात्याक्षीक करून दाखविले. पोलीस निरीक्षक श्री. शिवाजी राठोड यांचे सुचनेवरून पो.शि. संदीप घोरमोडे यांनी व्हॉईस रेकार्डर कश्याप्रकारे काम करतो. याबाबत सविस्तर माहीती देवुन लाच मागणीची पडताळणी दरम्यानचे संभाषण डिजीटल व्हॉईस रेकॉर्डरद्वारे रेकॉर्ड करण्यात येणार असल्याचे सांगीतले आणि सापळा कारवाईच्या वेळी घ्यावयाच्या दक्षतेबाबत मला व दोन्ही पंचांना सविस्तर सुचना दिल्या. यानंतर माझी अंगझडती घेउन व्हॉईस रेकॉर्डर मध्ये सॅनडीक्स कंपनीची 32 जीबीची नवीन मेमरी कार्ड टाकुन, वेळ 13.51 वा. व्हॉईस रेकॉर्डर सुरु केल्यावर पंच क्र. 1 श्री हार्दिक कुमरे यांच्या आवाजात त्यांचे नाव व दिनांकासह संभाषण रेकॉर्ड केले. यानंतर चालु स्थितीतील व्हॉईस रेकॉर्डर माझे कॉटन जिन्स पॅन्टच्या समोरील उजव्या बाजूचे चोर खिशात ठेवून रमेश कवडो, तलाठी वडधा यांचेकडे लाच मागणी पडताळणी करीता तलाठी कार्यालय वडधा येथे माझे अँक्टीवा स्कुटीने पंच क्र. 1 यांना बसवून रवाना केले. तेव्हा गैरअर्जदार रमेश कवडो, तलाठी वडधा हे तलाठी कार्यालय वडधा येथे हजर मिळुन आले. त्या दरम्यान रमेश कवडो, तलाठी वडधा यांनी मला काही नाही, त्यादिवशी म्हणलो ते, असे बोलल्यानंतर मी त्यांना नाही थोडासा कमी करा असे बोललो, त्यावर ते मला वाटल्यास हजार दोन हजार कमी देल्या तरी चालते, काही हे नाही, असे म्हणून मला 12,000/-रू. ची मागणी करून स्विकारण्याची तयारी दर्शविली. त्यानंतर मी पंच क्रं. 1 सह नियोजीत ठिकाणी परत आलो. लाच रक्कम मागणी बाबतची पडताळणी कारवाई करून परत आल्याबाबत पंच क्रं. 1 यांच्या आवाजात प्रमाणपत्राचे वाचन केल्यानंतर व्हॉईस रेकॉर्डर बंद करण्यात आला. त्यानंतर माझी अंगझडती घेतली. यानंतर पोलीस निरीक्षक श्री. शिवाजी राठोड साहेब यांनी पंच क्रं. 1 व 2 यांचेसमक्ष व्हॉईस रेकॉर्डमध्ये झालेले संभाषण ऐकुन व पंच क्र.1 यांचे घडलेल्या परिस्थीतीच्या कथनावरून रमेश कवडो, तलाठी, वडधा यांनी मुरूमाने भरूण असलेली ट्रॅक्टर पकडून सोडून दिल्याचा मोबदला व त्या ट्रॅक्टरवर कोणतीही कारवाई न करण्याच्या कामाकरीता 15,000/-रू. लाच रक्कम मागणी करुन तडजोडअंती 12,000/-रू. लाच रक्कम स्विकारण्याची तयारी दर्शविल्याची खात्री केली. त्यावरून श्री रमेश कवडो, तलाठी वडधा यांचे विरुध्द पुढील सापळा कारवाई करण्याचे ठरविण्यात आले. त्यानंतर माझी अंगझडती घेवुन श्री रमेश कवडो, तलाठी, वडधा यांनी तडजोडीअंती 12,000/- रूपयाची मागणी केल्याने मला पंचासमक्ष अँथ्रॉसिन पावडर लावलेली 15,000/- रूपयापैकी 3,000/- रू. लाचेची रक्कम परत देण्यात आली. सदर 12,000/- रू. माझे कॉटन जिन्स पॅन्टच्या मागील उजव्या बाजुचे खिश्यात ठेवण्यात आली. सापळा कारवाईच्या वेळी घ्यावयाच्या दक्षतेबाबत स्पष्ट सुचना देवुन रमेश कवडो,तलाठी, वडधा यांनी स्वतः किंवा इतर व्यक्तीच्या माध्यमातुन लाच रक्कम स्विकारल्यावर तलाठी कार्यालयाच्या बाहेर दर्शनी भागी येवून गळयात असलेला पांढऱ्या रंगाचा दुपट्टा डोक्याला बांधुन इशारा करण्याबाबत मला सांगीतले. त्यावेळी सापळा पथकातील सदस्य इशारा मिळताच लाच रक्कम स्विकारणाऱ्यास रंगेहाथ पकडतील असे सांगण्यात आले. त्यानंतर माझी अंगझडती घेवुन व्हॉईस रेकॉर्डर पुन्हा सुरू करून व्हॉईस रेकॉर्डरवर पंच क्रं. 1 यांचे आवाजाचा नमुना घेवुन व्हॉईस रेकॉर्डर कॉटन जिन्स पॅन्टच्या समोरील उजव्या बाजूचे चोर खिशात ठेवून रमेश कवडो, तलाठी वडधा यांचेकडे लाच रक्कम देण्याकरीता तलाठी कार्यालय वडधा येथे माझे अँक्टीवा स्कुटीने पंच क्र. 1 यांना बसवून रवाना केले. त्याचवेळी सापळा पथकातील काही सदस्य गटा-गटाने माझे मागोमाग आले. मी तलाठी कार्यालय वडधा येथे गेलो असता तेथे रमेश कवडो, तलाठी वडधा हे हजर मिळाले. त्यांनी कामासंबंधी बोलणी करून हाताच्या ईशाऱ्याने लाच रक्कमेची मागणी करून चांगल्या मनाने देत आहा ना, असे बोलल्याने मी चांगल्या मनाने देत आहो, मापून टाका, असे बोलून मी अँथ्रॉसिन पावडर लावलेली रू. 12,000/- लाचेची रक्कम माझे कॉटन जिन्स पॅन्टच्या मागील उजव्या बाजुच्या खिश्यातुन उजव्या हाताने काढुन रमेश कवडो, तलाठी वडधा यांना दिले असता, त्यांनी लाच रक्कम रू. 12,000 /- आपल्या उजव्या हाताने स्वीकारून दोन्ही हाताने मोजुन दोन हजार जास्त घेतलो आता, असे म्हणून फुल पॅन्टच्या समोरील उजव्या बाजुचे खिशात ठेवले. त्याच वेळी मी पंच क्रं. 1 सोबत दर्शनी ठिकाणी येवुन 15.04 वाजता सापळा पथकास माझे खांद्यावरील दुपट्टा डोक्याला बांधुन लाच रक्कम स्विकारल्याचा नियोजीत इशारा केला. त्याच वेळी सापळा पथकाने रमेश कवडो, तलाठी वडधा यांना रंगेहात पकडुन पुढील कारवाई केली व पंच क्रं. 1 यांच्या आवाजात प्रमाण पत्राचे वाचन केल्यानंतर व्हॉईस रेकॉर्डर बंद करण्यात आला. त्यानंतर माझी

अंगझडती घेतली. त्याबाबत सदर सापळा कार्यवाहीबाबतच्या सविस्तर नोंदी सापळा अधिकारी पोलीस निरीक्षक श्री. शिवाजी राठोड यांनी पंचनामा क्रं. 2 मध्ये घेतल्या आहेत. तरी लोकसेवक श्री. रमेश महागु कवडो, वय 32 वर्षे, पद तलाठी, साजा क्र. 15 वडधा ता. आरमोरी जि. गडचिरोली यांनी आपल्या लोकसेवक पदाचा दुरूपयोग करून माझी मुरूमाने भरूण असलेली ट्रॅक्टर पकडून सोडून दिल्याचा मोबदला व त्या ट्रॅक्टरवर कोणतीही कारवाई न करण्याच्या कामाकरीता 15,000/-रू. लाच रक्कमेची मागणी करून तडजोडीअंती रु. 12,000/- रू. लाच रक्कम स्विकारतांना रंगेहात मिळून आले. म्हणुन माझी त्यांच्याविरूध्द कायदेशिर फिर्याद आहे. माझी वरील फिर्याद मराठीत लॅपटॉपवर टंकलिखीत केली असुन प्रिंट काढल्यानंतर मी वाचुन पाहीली. ती माझे सांगण्याप्रमाणे बरोबर व खरी आहे.

13. **Action taken: Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at Item No. 2. (**केलेली कारवाई: बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.**)**

(1) **Registered the case and took up the investigation:**
**(**प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले**):**

**or (**किंवा**)**

(2) **Directed (Name of I.O.) (**तपास अधिका-याचे नाव**):**
sachin dagadu bhilari
**Rank (**पद**):** SI (Sub-Inspector) **No.(**क्र.**):** dgpsdbm9202
**to take up the Investigation (**ला तपास करण्याचे अधिकार दिले**) or (**किंवा**)**

(3) **Refused investigation due to (**ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला**):**

**or (**ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला**)**

(4) **Transferred to P.S.**
**(**गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव**):**

**District (**जिल्हा**):**
**on point of jurisdiction (**को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित**) .**

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost. (**प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.**)**

**R.O.A.C.(**आर. ओ .ए .सी.**)**

14 **Signature/Thumb impression of the complainant / informant.**
**(**तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा**):**

Lyselote

15. **Date and time of dispatch to the court**
**(**न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ**):**

**Signature of Officer in charge, Police Station**
**(**ठाणे प्रभारी अधिका-याची स्वाक्षरी**)**

सचिन द. भिलारी
पोलीस उप-निरीक्षक
पो. स्टे. आरमोरी

**Name (नाव):** Sandip Punja Mandli
**Rank(पद):** PI (Inspector)
**No.(सं.):** dgpspmm8902

**Attachment to item 7 of First Information Report (प्रथम खबरीतील मुद्दा क्र. ७ ला जोडपत्र): Physical features, deformities and other details of the**
**( If known / seen )(संशयीत/आरोपीचे (माहित असलेल्या/पाहिलेल्या) शारीरिक वैशिष्टये, व्यंग आणि इतर तपशील))**

| S.No.(अ.क्र.) | Sex (लिंग) | Date/Year of Birth (जन्म तारीक/ वर्ष) | Build (बांधा) | Height (cms.) (उंची(सें. मी.)) | Complexion (रंग) | Identification Mark (s) (ओळखीच्या खुणा) |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 |
| 1 | पुरुष | | मजबुत | | | चेचक के दाग: NO |

| Deformities/ Peculiarities | Teeth (दात) | Hair (केस) | Eyes (डोळे) | Habit(s) (सवयी) | Dress Habit(s) (पोषाखाच्या सवयी) |
|---|---|---|---|---|---|
| 8 | 9 | 10 | 11 | 12 | 13 |
| | | | | | |

| Language /Dialect (भाषा / बोलीभाषा) | Place Of (का स्थान) | | | | | Others (इतर) |
|---|---|---|---|---|---|---|
| | Burn Mark (भाजल्याच्या खुणा) | Leucoderma (कोड) | Mole (तिळ) | Scar (व्रण) | Tattoo (गोदण) | |
| 14 | 15 | 16 | 17 | 18 | 19 | 20 |
| | | | | | | |

**These fields will be entered only if complainant/informant gives any one or more particulars about the suspect/accused.**
**(**जर तक्रारदार/माहिती देणा-याने संशयीत/आरोपीविषयी एक किंवा त्यापेक्षा अधिक तपशील दिल्यास फक्त यातील रकान्यांची नोंद घेतली जाईल.**)**